“नांदेड जिल्हा परिषदेच्या उत्पन्न व खर्चाचे अध्ययन : एक अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

पीएच.डी.(वाणिज्य) पदवीसाठी सादर करावयाचा

संशोधन आराखडा

:: संशोधक ::

इंगळे मधुसुधन वामनराव

एम.कॉम्,बी.एड.

मो.क्र.९९६०१२८०९६

E-mail : inglemadhusudhan@gmail.com

:: मार्गदर्शक ::

डॉ. कन्हैया बाबुराव पाटोळे

वाणिज्य विभाग प्रमूख

के.के.एम. महाविद्यालय मानवत

मो.क्र. ९४०४८६५१०१

E-mail : kanhayasir@gmail.com

अभ्यासकेंद्र

वाणिज्य व व्यवस्थापन शास्त्र संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

ऑगस्ट २०१७

“नांदेड जिल्हा परिषदेच्या उत्पन्न व खर्चाचे अध्ययन : एक अभ्यास”

प्रस्तावना –

महाराष्ट्र राज्यात दक्षिण टोकाला तेलंगणा राज्याच्या सिमेलगत नांदेड जिल्हा वसलेला आहे. **“नांदेड”** या नावाचा उगम ‘‘नंदी-तट’’ या शब्दापासून झालेला असून ‘‘नंदी’’ म्हणजे भगवान श्री शंकराचे वाहन आहे आणि ‘‘तट’’ म्हणजे पवित्र गोदावरी नदीचा काठ नंदीने गोदावरी नदीच्या किनाऱ्यावर तपस्या केली असल्याची अख्यायिका आहे. आज नांदेड जिल्हा हुजूर साहेब नांदेड या नावाने प्रख्यात झाला आहे. शिख धर्माचे गुरू श्री गोविंद सिंघजी महाराज यांनी सन १७०५ मध्ये या ठिकाणी आपला देह ठेवला.

महाराष्ट्रातील दख्खनच्या पठारावर असलेल्या मराठवाडा विभागातील ८ जिल्ह्यापैकी नांदेड हा एक जिल्हा आहे. मराठवाड्यातील आठ जिल्ह्यापैकी औरंगाबाद शहराच्या नंतर नांदेड सर्वात मोठा जिल्हा आहे. नांदेड जिल्ह्याचे क्षेत्रफळ १०५०२ वर्ग कि.मी. असून २००१ च्या जनगननेनुसार नांदेड जिल्ह्याची लोकसंख्या २८७६२५९ असून त्यापैकी ७६टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहते व २४टक्के लोकसंख्या शहरी भागात राहाते. या जिल्ह्यातील ‘‘गोदावरी’’ नदी ही प्रमूख नदी असून या नदीने वाहून आणलेल्या गाळामुळे जिल्ह्यातील नदीकाठचा प्रदेश सुपिक बनला आहे. या जिल्ह्यातील लोकांचा प्रमूख व्यवसाय शेती हा आहे.

नांदेड जिल्ह्यात अर्धापूर, भोकर, देगलूर, बिलोली, किनवट, लोहा, माहूर, मुदखेड, धर्माबाद, मुखेड, हदगांव, नांदेड, हिमायतनगर, नायगांव (खै.), कंधार, उमरी असे एकूण १६ तालुके असून, अर्धापूर, माहूर, हिमायतनगर व नायगांव (खै.) या चार तालुक्यात नगरपंचायत व नांदेड-वाघाळा महानगरपालिका वगळता बाकी ११ ठिकाणी नगरपरिषदा आहेत.

अभ्यासाचे महत्व –

ग्रामीण भागात सामाजिक, आर्थिक विकास साधण्याचे कार्ये “पंचायत राज” संस्थाकडे सोपविण्यात आले आहे. पंचायती राज ही ग्रामीण भागातील स्थानिक प्रशासनामध्ये जनतेच्या सहभागाची केलेली एक रचना होय. या रचनेत जिल्हा परिषदेला दिलेले महत्व अनन्यासाधारण आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यपध्दतीत जिल्हा परिषदांना दिलेले महत्व लक्षात घेता जिल्हा परिषदांची कार्यप्रणाली जिल्ह्यांच्या सर्वांगिण विकासासाठी विशेष करून ग्रामीण विकासासाठी महत्वाची मानली जाते. शासनाकडून मिळणारे अनुदान, स्वतःची उत्पन्नाची साधने व कर्जाद्वारे विकास व विकासेत्तर कामे जिल्हा परिषदेला करावी लागतात. पंचायत राजच्या कालावधीत जिल्हा परिषदेचे महत्व अनन्यसाधारण असल्याचे दिसून येते. १९९१ च्या नविन आर्थिक धोरणांचा परिणाम म्हणून जिल्हा परिषदेला मिळालेला उत्पन्नाचे स्त्रोत व त्याची गती आणि खर्च यातुन होऊ घातलेली विकासाची क्षमता या अभ्यासातून अभ्यासासायची आहे. जिल्हा परिषदांना मिळणारे उत्पन्न आणि त्यांच्याकडून विकासाच्या अपेक्षा सदरील अभ्यासावरून स्पष्ट होईल असे वाटते.

अभ्यासाचे उद्दिष्टे –

सदरील अभ्यासाचे उद्दिष्ट्ये खालील प्रमाण निश्चित केले आहेत –

१) जिल्हा परिषदेचा परिचय नांदेड जिल्ह्याच्या संदर्भात देणे व जिल्हा परिषदेचे प्रक्रियेतील स्थान स्पष्ट करणे.

२) नांदेड जिल्ह्याची आर्थिक व सामाजिक पाश्वभूमी मांडणे.

३) नांदेड जिल्हा परिषदेची ऐतिहासिक पार्श्वभूमी, संघटनात्मक संरचना व कार्यपध्दतीचा सामान्य परिचय देणे.

४) नांदेड जिल्हा परिषदेच्या अंदाजपत्रकानुसार वित्तीय स्थितीचा विश्लेषणात्मक अभ्यास करणे.

५) नांदेड जिल्हा परिषदेच्या उत्पन्नाच्या विविध स्त्रोतांचा विश्लेषणात्मक अभ्यास करणे.

६) नांदेड जिल्हा परिषदेच्या उत्पन्नाचा व विविध खर्चाचा विश्लेषणात्मक अभ्यास करणे.

७) नांदेड जिल्हा परिषदेला मिळणाऱ्या अनुदानाचा विश्लेषणात्मक अभ्यास करणे.

८) नांदेड जिल्हा परिषदेचा जिल्ह्याचा विकासात झालेल्या योगदानाचा विश्लेषणानात्मक अभ्यास करणे.

९) संशोधनाची उपलब्धी व निष्कर्ष मांडून नांदेड जिल्हा परिषदेची वित्तीय स्थिती सुधारण्याच्या दृष्टीने उपाययोजना सुचविणे.

अभ्यासाची गृहीतके –

१) नांदेड जिल्हा परिषदेचा नांदेड विभागात खर्च व उत्पन्नाचे प्रमाण वाढत असून उत्पन्नातील वाढीच्या तुलनेत खर्चातील वाढ जास्त असल्याचे दिसून येते.

२) नांदेड जिल्हा परिषदेच्या कार्यपध्दतीतील विविध समस्या या व्यवस्थापकिय प्रश्नामुळे व अंतर्गत समन्वयाच्या अभावामुळे निर्माण होतात.

३) नांदेड जिल्हा परिषदेची वित्तीय स्थिती सुधारण्यासाठी अत्याधुनिक दृष्टिकोन स्वीकारून प्रशासन तसेच कर्मचारी वर्गाने व्यापक दृष्टिकोणाचा स्वीकार करणे.

४) नांदेड जिल्हा परिषदेने वित्तीय स्थिती सुधारण्यासाठी उत्पन्नाचे नवे स्त्रोत शोधन खर्चावर नियंत्रण करणे.

अभ्यासाचा कालावधी –

नांदेड जिल्हा परिषदेच्या उत्पन्न व खर्चाचे अध्ययन करण्यासाठी १९९६-१९९७ ते २०१६-२०१७ असा सलग २०वर्षाचा कालावधी निवडला असून उद्देश निहाय प्रवृत्ती आजमावण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

संशोधन पध्दती –

प्रस्तुत संशोधन ऐतिहासिक सर्वेक्षण स्वरूपाचे असून यात वर्णनात्मक पध्दतीचाही उपयोग करण्यात आला आहे. सांख्यिकीय विश्लेषण पध्दतीचा वापर या संशोधनाचे वैशिष्ट्ये आहे हे लक्षात घेऊन संशोधनाकाने संशोधन पध्दती निवडली आहे, ती खालीलप्रमाणे

प्रस्तुत संशोधन हे ऐतिहासिक, अनुभवजन्य क्षेत्रीय निरीक्षणाच्या स्वरूपाचे संशोधन आहे. हे लक्षात घेता संशोधकाने अशा संशोधनास अनुकूल ठरणाऱ्या संशोधन पध्दतीची निवड केली जाईल, संशोधनासाठी प्राथमिक तथ्य संकलन व दुय्यम तथ्य संकलनाच्या विविध मार्गाचा अवलंब केला जाईल.

माहितीचे प्राथमिक स्त्रोत –

प्राथमिक माहिती स्त्रोतात निरीक्षण, मुलाखत आणि प्रश्नावली ही प्रमूख साधने वापरली आहेत. संशोधकाने नांदेड जिल्हा परिषदेच्या वित्तीय स्थितीचा विश्लेषणात्मक अभ्यास करण्यासाठी प्रश्नावली तयार करून माहिती मिळविली जाईल.

संशोधकाने खालील घटकांसाठी प्रश्नावली तयार करण्याचे ठरविले आहे

प्रश्नावली 'अ' – नांदेड जिल्हा परिषदेचे सदस्य, प्रशासन व कर्मचाऱ्यांसाठी प्रश्नावली.

प्रश्नावली 'ब' – नांदेड जिल्हा परिषदेच्या क्षेत्रातील लाभार्थीसाठी प्रश्नावली

प्रश्नावलीच्या साह्याने प्रत्यक्ष भेटी देऊन प्राथमिक तथ्यसंकलन करण्यात येईल.

माहितीचे दुय्यम स्त्रोत :

दुय्यम माहिती स्त्रोतात संशोधनकर्त्याने व्यक्तिगट साधने, सार्वजनिक साधने व इतर साधनांचा वापर केला आहे.

१) नांदेड जिल्हा परिषदेचे वार्षिक अहवाल १९९६-१९९७ ते २०१६-२०१७.

२) नांदेड जिल्हा परिषदेचा उत्पन्न व खर्चाचा तपशिल १९९६-१९९७ ते २०१६-२०१७

३) नांदेड जिल्हा परिषदेचे विविध अहवाल

४) वृत्तपत्रे, नियतकालिके, शोधपत्रिका, इंटरनेट इ.अन्य स्त्रोत

या प्रमाणे नांदेड परिषदेच्या वित्तीय स्थितीचा अभ्यास करण्यासाठी संशोधकाने विविध दुय्यम स्त्रोतांचा उपयोग केला आहे.

संशोधनाची नमुना निवड :

प्रस्तुत संशोधनामधील एकूण जनसंख्या व निवडण्यात आलेला न्यादर्श सदस्य, प्रशासन व कर्मचारी तसेच लाभार्थी यामधून निवडला आहे. सदस्य प्रशासन व कर्मचारी मिळून १०० प्रतिसादक निवडले जातील. तसेच नांदेड जिल्हाच्या १६ तालुक्यातून प्रत्येकी २० असे ३२० प्रतिसादक निवडले जातील.

तथ्य संकलनाचे सांख्यिकीय विश्लेषण :

संशोधनकर्त्याने जी माहिती प्राप्त केलेली आहे. सर्व माहितीची एक सर्वसाधारण असा तक्ता तयार करण्यात आला. उत्तरदात्याने प्रश्नावलीत प्रश्नांच्या स्वरूपात जी उत्तरे देतील त्या उत्तरांचे वाक्यांमध्ये वर्गीकरण करण्यात येईल. अशा प्रकारचे वर्गीकरण करत असताना जे प्रतिसाद सर्वसाधारण व सम स्वरूपी होते त्यांना विशिष्ट संकेत देण्यात येतील म्हणजे उत्तरदात्याचे अभिप्राय संकेतामार्फत वर्गीकृत केले जाईल व ते विविध तक्त्यांमध्ये प्रदर्शित केले जाईल.

तथ्यसंकलनाची विश्वसनीयत्ता –

संशोधकाने तथ्यांचे संकलन करित असताना शास्त्रीय स्वरूपाची सर्व साधने उपयोगात आनली जातील संशोधनासाठी विश्वसनीय माहिती प्राप्त करण्यासाठी स्वतः अभ्यासाच्या क्षेत्रात उतरल्यामुळे उत्तरदात्याशी संशोधनासाठी विश्वसनीय माहिती प्राप्त करण्यासाठी स्वतः अभ्यासाच्या क्षेत्रात उतरल्यामुळे प्रतिसादकांच्या प्रत्यक्षभेटी घेऊन माहिती मिळविली जाईल.

संशोधनाच्या प्रकरणांची मांडणी :

पस्तुत संशोधनाची प्रकरणांची मांडणी खालीलप्रमाणे राहिल.

प्रकरण पहिले – प्रस्तावना

प्रस्तुत पहिल्या प्रकरणात विषयाची प्राथमिक मांडणी करण्यात येणार असून संशोधन विषयाचे महत्व व व्याप्ती विशद करण्यात येईल. या प्रकरणात प्रस्तुत अध्ययनाची आवश्यकता स्पष्ट करून संशोधनाची उद्दीष्टे, मर्यादा, तसेच संशोधन गृहीतके मांडण्यात येणार आहेत. संशोधन पध्दतीचा आराखडा देऊन प्रकरणांची मांडणी प्रस्तुत करण्यात येईल.

प्रकरण दुसरे - संशोधन विषयक साहित्याचा आढावा

प्रस्तुत दुसऱ्या प्रकरणात संशोधन विषयाशी निगडित पूर्व संशोधन तसेच संबंधित साहित्याचा मागोवा प्रस्तुत करण्यात येतील.

प्रकरण तिसरे - संशोधन क्षेत्राची पार्श्वभूमी

प्रस्तुत प्रकरण दुय्यम माहितीस्त्रोतावर आधारलेले आहे. प्रस्तुत तिसऱ्या प्रकरणात नांदेड जिल्ह्याची ऐतिहासिक व भौगोलिक व्याप्ती स्पष्ट करण्यात येईल, नांदेड जिल्हा परिषदेच्या वित्तीय पाश्वभूमीचा अभ्यास देखील या प्रकरणात मांडण्यात येईल.

प्रकरण चौथे – नांदेड जिल्हा परिषद

प्रस्तुत चौथ्या प्रकरणात विषयाच्या संकल्पनात्मक पार्श्वभूमिचा अभ्यास करण्यात येईल आणि नांदेड जिल्हा परिषदेच्या जडणघडणीचा व कार्याचा ऐतिहासिक आढावा घेण्यात येईल.

प्रकरण पाचवे – नांदेड जिल्हा परिषदेच्या उत्पन्नाचा अभ्यास

प्रस्तुत पाचवे प्रकरण हे प्राथमिक तसेच दुय्यम माहितीच्या स्त्रोतांवर आधारलेले राहिल. यात नांदेड जिल्हा परिषदेच्या उत्पन्नाचा विश्लेषणात्मक अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण सहावे - नांदेड जिल्हा परिषदेच्या खर्चाचा अभ्यास

प्रस्तुत सहावे प्रकरण हे प्राथमिक तसेच दुय्यम माहितीच्या स्त्रोतांवर आधारलेले राहिल. यात नांदेड जिल्हा परिषदेच्या खर्चाचा विश्लेषणात्मक अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण सातवे – नांदेड जिल्हा परिषदेच्या वित्तीय व्यवस्थापनाशी निगडित प्रश्न

प्रस्तुत सातवे प्रकरण हे प्राथमिक तसेच दुय्यम माहितीच्या स्त्रोतांवर आधारलेले राहिल. यात नांदेड जिल्हा परिषदेच्या वित्तीय व्यवस्थापनाशी निगडित विविध प्रश्नांचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण आठवे – निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तुत सातव्या प्रकरणात अध्ययनाचे निष्कर्ष मांडून शिफारशी देण्यात येतील.

प्रबंधाच्या शेवटी संदर्भ ग्रंथ सूची व प्रश्नावली जोडण्यात येईल.

मार्गदर्शक

डॉ. कन्हैया बाबुराव पाटोळे
वाणिज्य विभाग प्रमूख
के.के.एम. महाविद्यालय मानवत
मो.क्र. ९४०४८६५१०१

संशोधक

इंगळे मधुसुधन वामनराव
एम.कॉम्,बी.एड.
मो.क्र.९९६०१२८०९६